# मानवी हक्क

मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३

बुधवार, ३० सप्टेंबर, २००९

मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३ अंतर्गत राष्ट्रीय मानवी हक्क आयोग व राज्य मानवी हक्क आयोग स्थापन करण्यात आले आहेत. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगास या कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी विशेष अधिकार प्रदान केले गेले आहेत. राष्ट्रीय वा राज्य मानवी आयोग स्वत:देखील मानवाधिकार उल्लंघनाची दखल घेऊन कारवाई करु शकतात. याबाबतच्या विविध तक्रारीचे निवारण करणे, गुन्हेगारास इतर कायद्यांतर्गत न्यायालयाद्वारे शिक्षा व्हावी यासाठी योग्य ती कार्यवाही करण्याचे काम आयोग करीत असते.मानवी हक्क म्हणजे काय, त्यांचे स्वरूप, त्यांचे उल्लंघन झाल्यास तक्रार करण्याची पध्दत, मानवी हक्क आयोगाचे अधिकार या सार्‍यांबाबत या कायद्यात विवेचन करण्यात आले आहे.

तक्रार कुठे करता येईल?

१) मानवी हक्कांच्या हननांविरुध्द तक्रारी पीडित व्यक्ती स्वत:, तिचे नातेवाईक वा सामाजिक संस्था राष्ट्रीय वा राज्य मानवी आयोगाकडे लेखी वा तोंडी करु शकतात.
२) राष्ट्रीय वा राज्य मानवी आयोग स्वत:देखील मानवाधिकार हननाची दखल घेऊन कारवाई करु शकतात.
३) अशा तक्रारीचे निवारण करणे, गुन्हेगारास इतर कायद्यांतर्गत न्यायालयाद्वारे शिक्षा व्हावी यासाठी योग्य ती कार्यवाही करण्याचे काम आयोग करीत असते.
४) आयोगाकडे साध्या पोस्टकार्डावर देखील तक्रार करता येते.
५) तसेच भारतात वेगवेगळ्या ठिकाणी मानवी हक्कांच्या संरक्षणासाठीचे सल्ले व उपाययोजना शासनास सुचविण्याचे काम पण आयोग करीत असते.
६) महाराष्ट्रात मुंबई येथे राज्य मानवी हक्क आयोगाचे कार्यालय आहे.

मानवी हक्क म्हणजे काय?

संयुक्त राष्ट्र परिषदेने स्वीकृत केलेल्या नागरी, राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक अधिकारांच्या आंतरराष्ट्रीय जाहिरनाम्यांमध्ये व इतरही आंतरराष्ट्रीय जाहिरनाम्यातील भारतीय केंद्र सरकारने मान्य केलेले सर्व अधिकार, ज्यांना भारतीय संविधान व विविध कायद्यात मान्यता दिली गेली आहे आणि ज्यांची अंमलबजावणी भारतीय न्यायालये करु शकतात, असे सर्व अधिकार म्हणजे मानवी हक्क होत.

थोडक्यात

१) भारतीय संविधानातील नमूद केलेले अधिकार
२) विविध कायदेशीर अधिकार व न्यायालयीन खटल्यांद्वारे निर्देशित अधिकार मानव अधिकारांच्या संकल्पनेत मोडतील.
३) राष्ट्रीय मानवाधिकार आयोग केंद्र शासनास तर राज्य मानवाधिकार आयोग राज्य शासनास आपआपले वार्षिक अहवाल सादर करीत असते. असे अहवाल संबंधित शासनास योग्य त्या कार्यवाहीसाठी लोकसभा व विधानसभेपुढे मांडावे लागतात.
४) एखाद्या महिलेचा मृत्यू हुंड्यासाठी झाल्याचा संशय आल्यास वा
झाल्यास त्यासंबंधी इत्यंभूत माहिती संबंधित जिल्हाधिकाऱ्याने राज्य मानवाधिकार आयोगास लवकरात लवकर देणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे त्या महिलेच्या मृतदेह विच्छेदन तपासणीचा अहवालसुध्दा राज्य आयोगास पाठविण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांवर असते.
५) नुकतेच राष्ट्रीय मानवाधिकार आयोगास या कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी खालील प्रकारचे विशेष अधिकार प्रदान केले गेलेत.

तक्रारीचे निवारण करताना वा अंतिम आदेश देताना राष्ट्रीय मानवी हक्क आयोगास जर आढळले की, मानवी हक्कांचे उल्लंघन करणारा व्यक्ती सरकारी अधिकारी आहे तर आयोग संबंधित सरकारला पीडित व्यक्तीला वा त्याच्या कुटुंबातील व्यक्तींना नुकसान भरपाई देण्यासाठी, संबंधित व सरकारी अधिकाऱ्यांविरुध्द न्यायालयीन कार्यवाही करण्यासाठी व इतर योग्य ती पाऊले उचलण्यासाठी शिफारस करु शकते. तसेच उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयामध्ये त्या संबंधी खटला दाखल करु शकते.